# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १६/०९/२०२५ ( मंगळवार )**

---

## नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्ड वरील गुन्हेगार प्रफुल्ल उर्फ विक्की विलास जाऊळकर याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांनी प्रफुल्ल उर्फ विक्की विलास जाऊळकर,वय २७ वर्षे, वार्ड क्रं १६, नरखेड ता. नरखेड ,जि नागपुर याला ३ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

नमुद आरोपीवर शरिराविरूध्दचे गुन्हे, जुगार,अवैध दारू असे गुन्हे दाखल असुन नमुद आरोपी हा गुन्हे करण्याचे सवयीचा आहे. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी प्राप्त तक्रांरीवरून आरोपीवर गुन्हे नोंद करून त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी नामे **प्रफुल्ल उर्फ विक्की विलास जाऊळकर** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवयीचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा **महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार** करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी **उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी**

प्रस्ताव मंजुर केला आहे. आज दिनांक १६/०९/२०२५ रोजी आरोपी नामे प्रफुल्ल उर्फ विक्की विलास जाऊळकर,वय २७ वर्षे, वार्ड क्र वार्ड क्रं १६, नरखेड ता. नरखेड ,जि नागपुर याला ३ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केल्याचा आदेश प्राप्त झाल्याने नमुद आरोपीला ३ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार करण्यात आले आहे.



आरोपी नामे प्रफुल्ल उर्फ विक्की विलास जाऊळकर

# पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत सणोत्सवानिमित्याने पोलीस पाटील, मस्कऱ्या गणपती तसेच नवरात्र उत्सवाचे आयोजकांची घेण्यात आली बैठक

**पोलीस स्टेशन रामटेक** :— सणोत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक आणि पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर,प्रभारी अधिकारी, रामटेक यांनी दिनांक १६/०९/२०२५ रोजी मस्कऱ्या गणपती, नवरात्र उत्सव संबंधाने पोलीस पाटील, मस्कऱ्या गणपती उत्सव आणि नवरात्री साजरा करणारे आयोजक यांची बैठक घेतली.

नमुद बैठकीमध्ये उपस्थितांना सणोउत्सव संबंधाने मार्गदर्शन करून. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन शांततेत सणोत्सव साजरा करण्यात बाबत सुचना देण्यात आल्या.





**अंमलीपदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद**
**अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक नागपुर ग्रामीण यांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १५/०९/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन मौदा हद्दीत **स्नेह नगर , मौदा येथे राहणारा आरोपी नामे भरत मुकुन्दाजी पोटभरे हा आपले राहते घरात अंमली पदार्थ गांजा बाळगुन गिऱ्हाईकांना विक्री करीत आहे.** मिळालेल्या महीतीच्या आधारे नमुद पथकाने घटनास्थळी जावुन आरोपीच्या घराची झडती घेतली असता २२४.४३ ग्रॅम वाजनाचा काळपट रंगाचा पान फुले बीया बोंडे असलेल उग्र वासाचा ओलसर गांजा सदृश्य पदार्थ किंमती २५००/—रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. पोलीसांनी गांजा सदृश्य पदार्थ आणि एक अॅड्रॉइड मोबाईल असा एकुण २२,५००/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

आरोपी नामे **भरत मुकुन्दाजी पोटभरे, रा. स्नेह नगर , मौदा** जि. नागपुर याच्या विरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## एन.डी.पी.एस. च्या गुन्हयातील पाहीजे आरोपीचा तात्काळ घेतला शोध तसेच त्याचे ताब्यातुन अवैध शस्त्र जप्त करून गुन्हा नोंद करण्यात आला एमआयडीसी बोरी पोलीसांची कामगिरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— दिनांक १२/०९/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकाने धाड टाकुन आरोपी नामे अंशुल संजय कारेमोरे,रा.गंगापुर झोपडपटटी टाकळघाट याचे घरातुन ९१७ ग्रॅम गांजा सदृश्य पदार्थ किंमती ९,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. नमुद आरोपीवर पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता परंतु आरोपीला पोलीसांची चाहुल लागताच तो पळुन गेला होता.

नमुद आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता. एमआयडीसी पोलीस नमुद आरोपीचा शोध घेत असतांना दिनांक १५/०९/२५ रोजी पोलीसांनी गोपनिय माहीतीच्या अधारे वर नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे अंशुल संजय कारेमोरे, वय २४ वर्ष, रा.गांगापुर झोपडपटटी, ता. हींगणा, जि. नागपुर याला गांगापुर झोपडपटटी येथुन ताब्यात घेतले. पोलीसांनी आरोपीच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता एक लोखंडी धारदार तलवार मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष तलवार जप्त केली आहे.

**नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे एमआयडीसी बोरी येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अवैध गांजाच्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६३२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १६/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६३२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३४ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि

पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण १०४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६३२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १५/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १६/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत कळमेश्वर टाउन, एमआयडीसी झोपडपट्टी, सेलु उपरवाही, खडगाव, हुडको कॉलनी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. तसेच ब्राम्हणी फाटा चौक, शिवाजी चौक, बाजार चौक येथे नाकाबंदी करण्यात आली.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री सागर खर्डे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने